# मनीषा मानेला आणखी दोन दिवस पोलीस कोठडीचा पाहुणचार; डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्येप्रकरणात कोर्टात युक्तीवाद जोरात

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी



डॉ. शिरीष वळसंगकर

सोलापूरसह राज्यभरात चर्चेत आलेल्या डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्येच्या प्रकरणात त्यांच्याच हॉस्पीटलमधील संशयित प्रशासन अधिकारी मनीषा मुसळे-माने हिला बुधवार (ता.२३) जिल्हा व सत्र न्यायालयातील मुख्य न्या. विजयसिंह भंडारी यांनी शुक्रवार ( ता.२५) पर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. फिर्यादीचे वकील प्रशांत नवगिरे, सरकारी वकील अमर डोके आणि चौंकशी अधिकारी सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे यांचं म्हणणं ऐकून त्यांनी पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. न्यायालयाच्या या आदेशामुळे शुक्रवारपर्यंत मनीषा मुसळे-माने हिला पोलीस कोठडीमधील पाहुणचार घ्यावा लागेल.

दरम्यान, डॉ.वळसंगकर आत्महत्येप्रकरणी अटकेत असलेल्या मनीषा-मुसळे-माने हिच्या पोलीस कोठडीच्या अनुषंगाने, आरोपींचे वकील नवगिरे, सरकारी वकील डोके आणि तपास अधिकारी पोलीस निरीक्षक लकडे यांनी न्या.भंडारी यांच्यासमोर जोरदार युक्तिवाद केला. तसापात गती आहे, मात्र तपास पूर्ण होण्यासाठी संशयिताच्या पोलीस कोठडीची गरज आहे, या सरकारी पक्षाच्या मागणीसह आरोपींच्या वकिलाचे म्हणणे ऐकून दोन दिवसांची वाढीव पोलीस कोठडी मनीषा मुसळे-माने हिला सुनावण्यात आली.

विशेषत्वे, डॉक्टरांच्या आत्महत्येसंबंधी गृहकलाचा मुद्दाच पोलीसांनी दूर्लक्षीत केला आहे. रिमांडमध्ये रिपोर्टमध्ये मुसळे-मानेंच्याच वाढीव पोलीस कोठडीचीच मागणी केली. डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्येसंबंधी पोलिसांचा मनिषा मुसळे-मानेंच्या तपासावर केवळ फोकस दिसत आहे. मित्र परिवार, नातेवाईक, हॉस्पिटलमधील आणि प्रामाणिक स्टाफ यांच्या भावनेला हरताळ फासला जात असल्याची चर्चा आहे.

**गृहकलहाचा पोलिसांनी मुद्दाच केला दुर्लक्षित**

**रिमांडमध्ये रिपोर्टमध्ये मुसळे-मानेंच्याच वाढीव पोलीस कोठडीचीच मागणी**

**डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्येसंबंधी पोलिसांचा मनिषा मुसळे-मानेंच्या तपासावर केवळ फोकस**

**मित्र परिवार, नातेवाईक, हॉस्पिटलमधील प्रामाणिक स्टाफ यांच्या भावनेला हरताळ**

### संशयित मनीषाच्या बाजूने ॲड. प्रशांत नवगिरे यांच्या युक्तीवादामधील ठळक मुद्दे



- संशयित मनिषाची पोलीस कोठडी मिळविताना पोलीसांनी सुरुवातीला उपस्थित केलेले तेच ते आठ मुद्दे
- नव्याने पोलीस कोठडी मिळविताना अवघ्या दोन नव्या मुद्यांचा समावेश, पण त्यासाठीही पोलीस कोठडीची नाही गरज
- ई-मेल कॉपी सहज होते उपलब्ध ते कारण वाढीव पोलीस कोठडीसाठी कसे
- संशयिताचे हस्ताक्षर नमुने घ्यायला कशाला हवी पोलीस कोठडी, आता येथेही घेता येऊ शकतात
- ई-मेल वळसंगकर परिवारातील तिघांना पाठवला, त्यांच्याकडून कॉपी मिळविता येणे शक्य
- पाठविलेल्या धमकीच्या ई मेलबद्दल मनीषाने माफीनामा लिहिला होता
- मनिषा हिच्याबद्दल आपुलकी वळसंगकर परिवाराला होती म्हणूनच तिला १७ एप्रिलला परत बोलावले
- मनिषा हिच्याकडे पैशाचा व्यवहार येत नाही, या व्यवहारासाठी तिथे कॅशिअर वगैरे असतात
- मनिषा हिच्याकडील माहितीबद्दल सुरुवातीची तीन दिवसांची पोलीस कोठडी ठीक, वाढवी कोठडीची रज नाही

### मनीषा मुलास म्हणाली, येते रे बाळा...काळजी घ्या !



मनीषा मुसळे-माने

संशयित आरोपी मनिषा हिच्या पोलीस कोठडीची मुदत आज बुधवारी संपणार होती, या दरम्यान तिला कोर्टापुढे हजर करण्यात आले होते. कोर्टामधील कामकाज संपल्यानंतर कोर्ट हॉलच्या बाहेर तिला पोलीस महिला कर्मचारी घेऊन जात होत्या. यादरम्यान गर्दीतही हॉलमध्ये मनिषा हिच्या मुलाने तिला भेटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मनिषाने मान हलवत...येते रे बाळा ... काळजी घ्या...एवढेच सांगितले आणि ती पुढे पोलीस गाडीच्या दिशेने निघून गेली.



### कोर्टात नेमकं काय घडलं?

- डॉ. वळसंगकर आत्महत्येप्रकरणी संशयित मनीषाबद्दल काय होणार, याच्या उत्सुकतेपोटी गर्दी
- संशयित आरोपी मनीषाबद्दलचा युक्तीवाद ऐकण्यासाठी महिला वकिलांची विशेष गर्दी
- दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी कोर्ट कामकाज सुरु
- बचाव पक्षातर्फे ॲड. संतोष नवगिरेंचा अभ्यासपूर्ण युक्तीवाद
- साधारण अर्धा तास चालले कोर्ट कामकाज
- न्या. भंडारी यांनी संशयित मनिषा विचारले, आपणास काय सांगायचं आहे का, त्यावर ती उत्तरली, काही नाही
- संशयित मनीषा हिचा कोर्टात सर्वसामान्य आरोपींसारखे दिसले वर्तन
- प्रतिष्ठित व्यक्ती डॉ. वळसंगकरांची मारेकरी मनीषा आहे तरी कोण, या उत्सुकतेपोटी तिला पाहण्यासाठी लोकांची कोर्टात गर्दी
- मनीषा हिची दोन मुले,पती महेश यांच्यासह नातेवाई कोर्टात उपस्थित
- मनिषाच्या दोन्ही मुलांकडून निषेध म्हणून काळा रंगाचा पेहराव

“बुधवारच्या तपासामध्ये आरोपीची अजून दोन दिवस वाढीव पीसी रिमांड अधिक तपासासाठी मंजूर करून घेण्यात आलेली आहे. हॉस्पिटलमधील सुमारे पाच लोकांचे जबाब घेतले असून अधिक चौकशी तपास चालू आहे. आरोपीला इतर कोणी मदत केली आहे काय? याबाबतही अजून तपास चालू आहे.

**- अजित लकडे,** तपास अधिकारी, तथा मुख्य पोलीस निरीक्षक, सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर

### सरकारी पक्षाने संशयित मनीषाच्या वाढीव पोलीस कोठडीसाठी उपस्थित केलेले दहा मुद्दे

१) संशयित मनीषा हिच्या विरुद्ध हॉस्पीटलमधील २७ जणांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, चौकशी करुन जाबजबाब नोंदविणे

२) संशयित मनिषा हिने पाठविलेला धमकीचा ई मेल हस्तगत करुन त्यासंबंधी अधिक तपशील गोळा करणे

३) हॉस्पीटलमध्ये मनिषा हिने आक्षपार्ह कारभार केल्याच्या मिळालेल्या माहितीनुसार चौकशी करणे

४) मनिषा हिने हॉस्पीटलमध्ये केलेल्या आर्थिक गैरव्यवहारांच्या पार्श्वभूमीवर, चौकशी करुन सर्व माहिती संकलित करणे

५) मृत डॉ. वळसंगकरांवर केलेले खोटारडे आणि घाणेरडे आरोप यासंबंधी आरोपीचा हेतू आणि उद्देश पडताळणे

६) मृत डॉ.वळसंगकरांना वारंवार मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तपास करणे

७) संशयित मनीषा हिच्या हस्ताक्षरांमध्ये असलेले मुळ दस्त हस्तगत करुन तिच्या हस्ताक्षराचे नमुने घेणे

८) संशयित आरोनी मनीषाच्या कृत्यामागे कोणी मदत केली का? तिला मदत करणारे साथीदार शोधणे, त्या अनुषंगिक तपास करणे

९) मनीषाने फाडलेल्या माफीनाम्याचे तुकडे कोठे फेकले, ते हस्तगत करुन तपास करणे

१०) हॉस्पीटलमध्ये स्वत:च्या मर्जीने फेर बदल करण्यासह स्वत:चे वर्चस्व निर्माण करुन त्या आडून मनीषाने केलेल्या सर्व गैरकृत्यांची तपासणे करणे

### रिमांड रिपोर्टमध्ये गृहकलहाचा मुद्दाच नव्हता, संशयाची सुई कोणाकडे फिरण्याला सध्यातरी जागाच नाही

डॉ.वळसंगकरांच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर, संशयित आरोपी मनीषा मुसळे-माने हिला बुधवारी वाढीव पोलीस कोठडी मंजूर करुन घेण्यासाठी कोर्टासमोर पोलिसांनी उभे केले होते. दरम्यान वाढीव पोलीस कोठडीची मागणी करण्यासाठी पोलिसांनी जे दहा राऊंड उपस्थित केले, त्यामध्ये गृहकलाचा उल्लेख रिमांड रिपोर्टमध्ये नव्हता. त्यामुळे कोर्टात याबद्दलचा मुद्दा उपस्थित होऊ शकला नाही. मात्र संशयित आरोपी मनीषा माने हिचा पहिल्यापासून मुद्दा आहे की, गृहकलह होता. त्याचा त्रास तिला स्वत:लादेखील होत होता, असे संशयित आरोपीचे वकील ॲड. प्रशांत नवगिरे यांनी माध्यमांपुढे बोलताना पुन्हा एकदा स्पष्ट केले.

### आरोपीचे वकिल नवगिरे म्हणाले, अशिलास बोलायचं आहे, त्यावर कोर्ट ‘हे’ म्हणालं...

संशयित आरोपी मनिषा मुसळे-माने हिच्याकडून तिचे वकिल ॲड.प्रशांत नवगिरे यांना काही माहिती जाणून घ्यायची होती, त्यासाठी नवगिरे यांनी आशिलास दोन मिनिटे बोलु द्या, अशी न्या.भंडारी यांच्याकडे विनंती केली. त्यावर मा. कोर्टाने तातडीने होकार दिला. पुढच्या काही क्षणात कोर्ट हॉलमध्येच ॲड.नवगिरे यांनी संशयित मनीषा हिच्याकडून काही माहिती जाणून घेतली. त्यानंतर पुढच्या काही वेळातच प्रत्यक्ष युक्तीवाद सुरु झाला.

### संशयित मनीषाच्या चेहऱ्यावर अपराधीपणाच्या छटा

संशयित मनीषा हिला न्या. विजयसिंह भंडारी यांच्यासमोर पोलिसांकडून उभं करण्यात आलं. त्यावेळी तिची एकूण देहबोली तणावात दिसत होती, तरीपण अपराधीपणाच्या छटादेखील तिच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होत्या.



### न्या. भंडारी यांनी ‘हे’ आवर्जून विचारले...

घटनेतील संशयित आरोपी मनीषा हिने धमकीच्या अनुषंगाने, जो ई-मेल मृत डॉ. शिरीष वळसंगकरांना पाठिवला होता, तो जप्त करण्यात आला आहे का? हे न्या. विजयसिंह भंडारी यांनी तपास अधिकारी अजित लकडे यांना आवर्जून विचारले, त्यावर ई-मेल जप्त केल्याचे त्यांनी सांगितले.

## महिलेच्या गळ्यातील ६० हजारांचे गंठण पळवले

✔ बार्शी/प्रतिनिधी

रस्त्यावरून पायी जाणाऱ्या एका ५८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीचे गंठण दुचाकी वरून आलेल्या दोघा चोरट्यानी हिसका मारून पळवले. ही घटना जैन मंदिर रोडवरील रिलायन्स मॉलजवळ मंगळवारी घडली. जयश्री दिलीप गडशिंगे (रा.जैनमंदिर रोड, गुंडप्लॉट बार्शी) यांनी यासंदर्भात बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या मंगळवारी सकाळी घराजवळील रिलायन्स मॉल जवळून पायी निघाल्या होत्या. त्यावेळी पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोघा चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम सोन्याचे गंठण हिसका मारून तोडून नेले. गडशिंगे यांनी चोरट्यांना अडवण्याचा प्रयत्न केले असता ते झटापट करीत कुर्डूवाडी रोडच्या दिशेने दुचाकीवरून पसार झाले. याची नोंद पोलिसात झाली. हवालदार घाडगे पुढील तपास करीत आहेत.

### पिकअपच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी

**सोलापूर :** वेगाने जाणाऱ्या पिकअपच्या धडकेने दुचाकी वरील दोघेजण जखमी झाले. हा अपघात हैद्रा तांडा (ता. अक्कलकोट) येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडला. शावरसिद्ध दिलीप




गुरव (वय २१) आणि प्रज्वल भालचंद्र माने (वय २३ दोघे रा. आचेगाव ता.दक्षिण सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना वळसंग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते दोघे मंगळवारी रात्रीच्या सुमारास हैद्रा ते आचेगाव असा दुचाकी वरून प्रवास करीत होते. वाटेत पिकअपच्या धडकेने दोघेही जखमी झाले. याची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### तेर येथे अपघात; जखमी वृद्ध इसमाचा मृत्यू


**तेर :** येथील महाराष्ट्र संत विद्यालया समोर पायी चालत जात असताना दुचाकीच्या धडकेत जखमी झालेले शहाबोद्दीन महामुद मुलानी (वय ८९ रा.सुलतान चौक धाराशिव) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी पहाटे मयत झाले. ते सोमवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास पायी निघाले होते. त्यावेळी समोरून दुचाकी धडकल्याने ते जखमी झाले होते. त्यांना वसीयुद्दिन (नातू) यांनी सोलापुरात दाखल केले होते. याची नोंद सिव्हील पोलीस चौकित झाली आहे.

## पित्यासाठी मुलाची, सुपुत्रासाठी पित्याची, पत्नीसाठी पतीची अन् भावासाठी भावाची ‘जंग जंग पछाड’

- सोलापूर बाजार समिती निवडणुकीची रणधुमाळी जोरात
- पॅनल प्रमुख, उमेदवारांसह कट्टर समर्थकांची दमछाक
- निवडणुकीसाठी अवघे तीनच दिवस उरल्याने भागम्भाग्
- नातेसंबंध, पाहुणे-रावळे, दोस्ताना यातून मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा फंडा



दिलीप माने



पृथ्वीराज माने



सुभाष देशमुख



मनीष देशमुख

✔ सोलापूर/विष्णू सुरवसे




सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक आता अंतिम टप्यात आली आहे. सगळ्या मतदारांपर्यंत पोचताना दमछाक होत आहे. दरम्यान निवडणुकीमधील पॅनल प्रमुख तसेच उमेदवार यांच्या कुंटुबातील सदस्यदेखील निवडणुकीच्या आखाड्यात उतरुन विजयाचा गुलाल आपल्याच अंगावर घेण्यासाठी जंग जंग पछाडत आहेत. माजी आमदार दिलीप माने यांच्यासाठी सुपुत्र पृथ्वीराज माने, आमदार सुभाष देशमुख हे चिरंजीव मनीष देशमुखांसाठी, अनिता विभुते यांच्या विजयासाठी पती माजी संचालक केदारलिंग विभुते,माजी संचालक वसंतराव पाटील हे आपले चिरंजीव प्रथमेश यांच्यासाठी तर माजी व्हाईस चेअरमन श्रीशैल नरोळे यांच्या पदरात विजय पडावा म्हणून बंधू नटराज नरोळे हे प्रयत्नांची पराकष्टा करीत आहेत.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे. दिवस उजेडल्यापासून ते दिवस मावळेपर्यंत फक्त बैठक मध्ये प्रचाराचा विषय, शिवाय ‘आपण-आणि ते’ अशा विषयावर बैठकाचा सपाटा सुरु आहे. सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीच्या रणधुमाळीचा धुराळा वाढत्या उन्हात उडत आहे. बाजार समिती ताब्यात घेण्यासाठी सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलच्या माध्यमातून माजी आमदार दिलीप माने यांचे सुपुत्र पृथ्वीराज माने स्वत: तर यामध्ये युवा मंच कार्यकर्ते देखील जोर लावत आहेत. दक्षिणमध्ये सुरेश हसापुरे यांचे नातलग,कार्यकर्ते मित्र मंडळी हिरहिरीने सहभाग नोंदवत आहेत.




दक्षिण सोलापूर मधील सोसायट्या व ग्रामपंचायतींवर सुरेश हसापुरे यांचे चांगले वर्चस्व आहे. आमदार सुभाष देशमुख यांच्या शेतकरी परिवर्तन पॅनेलकडून पुत्र मनीष देशमुख यांच्यासाठी शिवाय पॅनलमधील उमेदवारासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू आहे. बळीराम साठे,विजयकुमार देशमुख,मनीष काळजे यांनी देखील आपली कमान सांभाळत प्रचारात आघाडी घेतली असून रामप्पा चिवडशेटी शिवाय मित्र, पै-पाहुणे अशा ओळखी काढत मतदारांची जोडणी दोन्ही बाजूने सुरू आहे.

आमदार सुभाष देशमुख मनिष यांच्या पदरात जास्तीजास्त मतदान पाडण्यासाठी जिवाचे रान करत आहेत. ऊन, वारा याची तमा न बाळगता,ना भूक ना ताण याची जाणीव न होता फक्त भेट आणि उमेदवारास मतदान करा, एकदा संधी मिळावी, अशी विनंती केली जात आहे. कट्टर राजकीय विरोधाला फाटा देत अनेकांची दारेही त्यांनी ठोठावली आहेत. दोन्ही पॅनल मध्ये तुल्यबळ व वजनदार उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहेत.

### प्रचाराची मॅरेथॉन, विजयासाठी वाटेल ते...

मतदानाला अवघे तीन दिवस शिल्लक आहेत. पहिल्या टप्प्यात बैठकीचे सत्र झाले. आता मात्र प्रचाराला गती आली आहे. उमेदवार तिन्ही तालुक्यातील घरे दारे,नाती- गोती,पक्षातील कार्यकर्ता,नेते पिंजून काढत आहेत, मतदारांच्या गाठीभेटी वर घेत प्रचार सुरू आहे.. थेट पॅनेल टू पॅनेलच मतदानाचा आग्रह मतदारांकडे धरला जात आहे. तीन तालुक्यात दोन पॅनलकडून प्रचाराची मॅरेथॉन सुरु आहे. मतदारांना आपल्याकडे आकर्षित करुन विजयाचा गुलाल अंगावर घेण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

### कल्याणशेट्टी, माने, हसापुरेंच्या पॅनलची आघाडी

आ. सचिन कल्याणशेट्टींसह माजी आमदार माने, सुरेश हसापुरे, राजशेखर शिवदारे व शिवानंद पाटील-कुडलकर, रामचंद्र होनराव यांचा वेगाने प्रचार सुरू आहे. प्रचारात आणि मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यात या कल्याणशेट्टी, माने आणि हसापुरे यांच्या पॅनलने आघाडी घेतली आहे.